# विपश्यना

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

साधक (मराठी)

वार्षिक शुल्क रु. ३०/-
आजीवन शुल्क रु. ५००/-

बुद्धवर्ष २५६२, श्रावण पौर्णिमा, २६ ऑगस्ट, २०१८ वर्ष 2 अंक ५

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


## धम्मवाणी

**अकतं दुक्कटं सेय्यो, पच्छा तप्पति दुक्कटं।**
**कतञ्च सुकतं सेय्यो, यं कत्वा नानुतप्पति।।**

*धम्मपद-314, निरयवग्गो.*

दुष्कृत (वाईट काम) न करणे श्रेयस्कर आहे (कारण की) दुष्कृत करणारा नंतर पश्चाताप करतो आणि सुकृत (चांगले काम) करणे श्रेयस्कर आहे, जे केल्याने (नंतर) पश्चाताप करावा लागत नाही.

## विपश्यना साधनेच्या सुवर्ण जयंतीनिमित्त धर्म प्रसार आणि पूज्य गुरुजींच्या प्रति कृतज्ञता प्रकटण्याची सुसंधी

३ जुलै १९६९ ला विपश्यना साधनेचे पहिले शिबिर मुंबईतील पंचायतीवाडी धर्मशाळेमध्ये लागले. अशा प्रकारे भारतात याच्या पुनरुत्थानाचा ५० वा वाढदिवस अर्थात ३ जुलै २०१८ पासून २ जुलै २०१९ पर्यंतचे संपूर्ण वर्ष सुवर्ण जयंती उत्सव साजरा करण्याचा संकल्प आहे ज्याने हे वर्ष साधकांची दैनिक साधना पुष्ट करण्यास सहायक ठरो. यासाठी पूर्ण वर्षभर ग्लोबल विपश्यना पगोडामध्ये दररोज एक दिवसाचे शिबिर नियमितपणे घेतले जाईल. ज्या कोणा साधक-साधिकांना जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ह्या शिबिरांचा ते लाभ घेऊ शकतील. त्यामुळे साधकांच्या साधनेमध्ये निरंतरता, नियमितता तर येईलच शिवाय त्यांपासून प्रेरणा प्राप्त करुन अधिकाधिक लोकात सद्धर्मासंबंधी जागरुकता उत्पन्न होईल आणि शिबिरात सामील होऊन ते आपले कल्याण करु शकतील. इतर ठिकाणीसुद्धा लोक अशाप्रकारे दैनंदिन साधना, सामुहिक साधना तसेच एक दिवसीय शिबिरांद्वारे या विद्येचा व्यावहारिक अभ्यास पुष्ट करुनच विपश्यनोत्सव साजरा करोत, हीच पूज्य गुरुदेवांप्रती खरी श्रद्धांजली आणि कृतज्ञता असेल.


विश्व विपश्यनाचार्य पूज्य श्री. सत्यनारायण गोयन्काजींच्या संक्षिप्त जीवन परिचयाची दुसरी कडी प्रस्तुत करीत आहोत.

गुरुजी कल्याणदत्त दुबेजींनी खरोखर कल्याण केले. रहीम आणि तुलसीच्या अध्यात्म रचनांनी बालमनाला ज्या प्रकारे धर्माकडे झुकविले ते जीवनात अत्यंत उपयोगी पडले.

### काही घटना

शाळेतली ही एक घटना. देशाच्या सुप्रीम कोर्टाचे जज्ज श्री. जीजीभाईंच्या प्रयत्नामुळे ७ व्या इयत्तेत सरकारतर्फे प्रथमोपचाराचा पाठ शिकविला गेला. त्या वेळी आम्हाला वाचण्यासाठी जे पुस्तक दिले होते त्यापेक्षा मोठे पुस्तक मी बाजारातून खरेदी केले, कारण नवनवीन पुस्तके वाचण्याची आवड मला लहानपणापासूनच होती. वडिलांनी पुस्तके खरेदी करण्याची सवलत मला नेहमीसाठीच देऊन ठेवली होती. हे पुस्तक पाहून परीक्षक डॉक्टर आनंदित झाले. मी परीक्षेत त्यांच्या प्रत्येक प्रश्नांची आवश्यकतेपेक्षा जास्त आणि बिनचूक उत्तरे दिली आणि संपूर्ण म्यंमामध्ये पहिला आलो. डॉक्टरांनी आपल्या अहवालात लिहिले की हा मुलगा सर्वात जास्त बुद्धिमान आहे. त्यांनी सांगितल्यानुसार म्यंमाचे तत्कालीन ब्रिटीश गव्हर्नर क्रोकीन यांनी एका मोठ्या सभेत मला सुवर्ण पदक प्रदान केले. या सर्वामागे आत्याचा पहिला पाठच बल देणारा ठरला.

पहिला पाठ शिकविणाऱ्या त्या धर्ममयी गुरुमाता आत्याच्या दटावणीने आणि कासू गुरुजी तसेच इतर गुरुंच्या कृपेचे हे फळ होते की मी प्रत्येक वर्गात पहिला येत होतो. माझे सर्व गुरुजी माझ्यावर विशेषरुपाने प्रसन्न होते. आत्यामाईची जेव्हा–जेव्हा आठवण करतो तेव्हा मनात अभिवादनाचे भाव जागतात. त्यांनी मला गुरुप्रती जो सन्मानाचा पाठ शिकवला तो मी जीवनभर विसरु शकलो नाही. कोणत्याही गुरुची निंदा केव्हाही करु नये. ही प्रतिज्ञा मी जीवनभर पार पाडली.



*पूज्य श्री गोयन्काजी व पूज्य माताजी आपल्या निवासस्थानी बसलेले.*

### याचे एक उदाहरण

खालसा शाळेचे सर्व अध्यापक सरदार होते. ते फार चांगले होते. सर्व एकापेक्षा एक सरस होते. प्रमुख अध्यापकांचे (हेडमास्टर) तर सांगणेच काय. पांढऱ्या लांब दाढीमुळे ते दिसण्यात खूप भव्य दिसत असत. एकदा एक घटना अशी घडली की ज्यामुळे थोडा कडवटपणा आला. शाळेचा नियम होता की कोणत्याही मुलाने होळी खेळून शाळेत येऊ नये. परंतु होळीचा दिवस होता म्हणून रस्त्यात एका उनाड मुलाने दुसरे काही नाही पण फौंटेन पेनची शाई माझ्या अंगावर शिंपडली. आम्ही शाळेत गेलो तेव्हा गुरुजी नाराज झाले; जे होळी खेळून रंगलेले कपडे घालून आले होते त्यांना बांबूच्या दंडूक्याने मारले. माझी पाळी आली. मी जाणत होतो की यात माझी चूक नाही. पण काय करणार? बांबूचा एक दंडूका मलाही मिळाला. त्याचे दुःख झाले. दुसऱ्या दिवशी जेव्हा गुरुजींना सत्य सांगितले तेव्हा असेही सांगितले की माझ्या मनात त्यांच्याविषयी जी दुर्भावना आली त्यासाठी मी माफी मागतो. त्यांना खूप आनंद झाला आणि माझ्याबद्दल त्यांचा स्नेह द्विगुणीत झाला. त्या वेळी कासू गुरुजी आणि आत्याची खूप आठवण आली.

खालसा शाळेचे सर्व अध्यापक सरदार होते. फक्त एक श्री. हरवंसरायजी पंजाबी गुरुजी होते. ते सुद्धा सर्व गुरुजींप्रमाणे खूप आनंदी स्वभावाचे होते. परंतु वारंवार सांगत असत की मारवाडी समाजात खूप दोष आहेत. ते

तुम्हाला काढावे लागतील. त्यांनी 'चांद' नावाच्या पत्रिकेच्या वार्षिक अंकाची एक प्रत माझ्या हातात दिली. त्यामध्ये मारवाडी समाजाची टिंगल केली होती.

मी प्रतिज्ञा केली की हे दोष अवश्य दूर करीन. गुरुजी फार आनंदीत झाले. ते खरोखर पक्के गुरुजी होते. इतर गुरुजनांकडूनही हाच सल्ला मिळाला की समाजात जे दोष आहेत त्यांना दूर केलेच पाहिजे. मी चांगले काम करण्याचा विडा उचलला. समाजाचे दोष दूर करण्यात मी पुढे झालो.

याच दिवसात आर्य समाजाशी माझा घनिष्ट संबंध आला. आर्य समाजाचे पंडित श्री. मंगलदेव शास्त्री फार चांगले गृहस्थ होते. त्यांच्यापासून खूप शिकायला मिळाले. समाज सुधारण्याच्या कामात त्यांचे खूप मोठे योगदान होते.

## मॅट्रीकचे शिक्षण

कासू गुरुजींनी आमच्याकडून एक, दिडकी (दीड) अडीचकी (अडीच) औटकीचे (साडेतीन) पाढे पाठ करवून घेतले होते. ते मला सर्व अभ्यासात खूप उपयोगी पडले. मॅट्रीक शाळेतील वयस्कर गुरुजी खूप भाऊक होते. मी शाळेतील प्रत्येक परीक्षेत पहिला येत होतो म्हणून त्यांचा माझ्यावर विशेष स्नेह होता. एकदा मी त्यांना भेटलो तेव्हा त्यांनी माझ्या डोक्यावरुन हात फिरविला आणि आशीर्वाद दिला. मी माझी अडचण त्यांना सांगितली की मी मॅट्रीकची परीक्षा देऊ इच्छितो, पण माझ्या घरातील माणसे मला फक्त दोन वर्षापर्यंतच शिक्षणाची परवानगी देत आहेत.

माझे मोठे भाऊ बाबूलालने ७ व्या इयत्तेनंतर शिक्षण बंद केले. यासाठी एकच मार्ग आहे की मला इयत्ता ७ वी नंतर डबल प्रमोशन द्या. म्हणजे मी इयत्ता ८ वी सोडून सरळ इयत्ता ९ वी मध्ये बसेन. मी त्यांना विश्वास दिला की तरीही मी इयत्ता ९ वी मध्ये पहिलाच येईन. शाळेतील एक गुरुजी श्री. कर्णसिंह यांनी मला दोन महिने शिकवणी देण्याचे वचन दिले. हेडमास्टर पूर्वीपासूनच तयार होते. त्यांना पूर्ण विश्वास होता की हा मुलगा चांगलेच करील. शेवटी मोठ्या गुरुजींनी डबल प्रमोशन दिले आणि मी त्या सर्वांच्या आशा पूर्ण केल्या.

कासू गुरुजींच्या शिकवण्यामुळेच मी ९ व्या इयत्तेत आणि बोर्डाची शासकीय परीक्षा १० व्या इयत्तेतसुद्धा हिंदी आणि गणितामध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. १०वीत संपूर्ण म्यंमामध्ये पहिला आलो. शासनाकडून सगळ्या सुविधा मिळाल्या. छात्रवृत्ती मिळाल्यानंतरसुद्धा मॅट्रीकपुढचे शिक्षण मी घेऊ शकलो नाही. जरी वडिलांनी माझा रंगूनच्या कॉलेजात प्रवेश घेतला होता, तरीपण तेथील श्रेष्ठ आणि वयस्कर लोकांनी माझ्या शिक्षणाला विरोध केला. त्यांनी वडिलांना सांगितले की ह्या वयामध्ये हा पुरातन सामाजिक व्यवस्थेचा विरोध करतो, तर आणखी पुढे शिकून न जाणो हा काय करेल? त्यांच्या सांगण्यावर वडिलांचा विश्वास बसला. रंगूनच्या कॉलेजात माझे केवळ तीन दिवस झाले होते. तेथून मला मांडलेला परत आणले आणि माझे शिक्षण संपले. वडिलांनी सांगितले, आता तू शिक्षण घेऊ शकत नाहीस. तुला नोकरी तर करायची नाही. एका व्यापाऱ्याला मॅट्रीकचे शिक्षण खूप झाले. यापेक्षा जास्त शिकून तू काय करशील? आता कामधंद्याला लाग. धंदा कसा करायचा याची गुरुकिल्ली शिकून घे. दुकानात बसावे लागेल. बळजबरीने माझे कॉलेजचे शिक्षण बंद झाले. तरीही मी घरीच हिंदीचा अभ्यास सुरु ठेवला होता आणि खाजगी परीक्षा देत राहिलो.

## हिंदीचा प्रचार-प्रसार

म्यंमामध्ये हिंदीचा प्रचार करण्याचे एक वेड सुरु झाले. आम्ही अखिल ब्रह्मदेशीय हिंदी साहित्य संमेलनची स्थापना केली आणि हिंदी प्रचाराच्या कामाला लागलो. एक साप्ताहिक विद्यापीठाचे आयोजन केले. मी एका रात्र-शाळेत हिंदी शिकविणे सुरु केले. भारतातील नागरी प्रचारणा सभा, वाराणसी तसेच राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा आणि हिंदी साहित्य संमेलन, प्रयागशी संपर्क केला. पुस्तके मागविली. त्यांचा अभ्यास म्यंमामध्येच करुन परीक्षा देत राहिलो. मी स्वतः केवळ मध्यमापर्यंतच शिकलो होतो. परंतु काही विद्यार्थ्यांना सहकार्य देऊन उत्तमापर्यंतची परीक्षा पास करविली. काळ बदलला. म्यंमामध्ये मिलिटरी शासन आले. त्यांनी बाहेरुन पुस्तके मागविणे बंद केले. प्रयागच्या हिंदी साहित्य संमेलनशी आम्ही संबद्ध (ॲफिलिएटेड) झालो होतो. त्याची प्रथमा, मध्यम आणि उत्तमापर्यंतचे शिक्षण आणि परीक्षेचे कार्य खूप प्रभावशाली पद्धतीने पूर्ण केले जात होते. यात पुष्कळ विद्यार्थी भाग घेत होते. परंतु प्रारंभिक हिंदीसाठी आम्हाला अडचणी आल्या. कारण सर्व शासकीय शाळांमध्ये हिंदीचे शिक्षण बंद केले गेले होते. म्हणून मी काही मित्रांना बरोबर घेऊन चौथीपर्यंतची पाठ्यपुस्तके तयार केली. त्यांना म्यंमामध्ये छापून शिकविणे सुरु केले. यामध्ये राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धाची पुस्तके प्रमुख होती. परंतु त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याच पाठ्यपुस्तकाला मान्यता मिळू शकत नव्हती. राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धाचे प्रमुख कार्यकर्ता भदंत आनंद कौसल्यायनजींशी माझा चांगला परिचय झाला होता. ते जेव्हा-जेव्हा म्यंमामध्ये येत असत तेव्हा गोयन्का निवासातच राहत असत. त्यांच्या सहकार्याने पुस्तकांची स्वीकृती प्राप्त करण्यात कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. म्हणजेच आम्ही प्रायमरीची जी पुस्तके छापली होती त्यांची परवानगी मिळाली. अशा प्रकारे पुस्तके आयात करण्याचा प्रश्न सुटला आणि हिंदी प्रचाराचे काम सुरळीत चालू राहिले.

भारतात ब्रिटिश सरकारने क्रांतिकारी पुस्तकांचे प्रकाशन बंद केले होते तरीही मी भदंत आनंदजींच्या माध्यमातून ही पुस्तके म्यंमामध्ये मागविली. तेव्हापासून माझ्या मनात हिंदीबरोबर देशासाठी क्रांतिकारी सेवेचा जोरदार उत्साह आला. त्यात मन्मथनाथ गुप्त यांनी लिहिलेल्या एका पुस्तकात भारतीय क्रांतीचे सांगोपांग वर्णन केले होते. त्यापासून मला मोठी प्रेरणा मिळाली. माझ्या कवितांमध्ये देशभक्तीची झलक येऊ लागली. अशा प्रकारे म्यंमामध्ये हिंदीचा प्रचार-प्रसार सहज होत गेला.

## कविता लेखन

कविता लिहिण्याची आवड मला बालपणापासूनच होती. म्यंमामध्ये राहात असतांना अनेक विषयांवर कविता लिहिल्या आणि तेथील कार्यक्रमांमध्ये वाचूनही दाखविल्या.

माझ्या कविता प्रामुख्याने साहित्य, देशप्रेम, नेत्यांचे गुणगान, योगदान, परिवार, सण या विषयांवर लिहिल्या आहेत. त्यापैकी काही कविता म्यंमामध्ये छापल्या आणि काही थोड्या कविता भारतातील पुस्तकात, मासिकांमध्ये-पत्रिकांमध्ये छापल्या. 'मेरी कविताएँ' नावाच्या पुस्तकात हा कविता संग्रह छापलेला आहे. अनेक कवितांच्या रचनेच्या तारखासुद्धा लिहिलेल्या आहेत.

## हिंदी लेखन

हिंदी भाषेवर आवश्यक तेवढे प्रभूत्व असल्याने पंधराव्यावर्षी जेव्हा मी ९ व्या इयत्तेत शिकत होतो तेव्हा एक लेख लिहिला होता. तो रंगूनमधून प्रकाशित होणाऱ्या एका साप्ताहिक पत्रिकेत प्रसिद्ध झाला. तेव्हा माझा आनंद गगनात मावत नव्हता. लोकांनासुद्धा हे कळावे की माझा लेख म्यंमाच्या एका प्रसिद्ध साप्ताहिक पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे, म्हणून मी माझ्या बेंचवर बसून पुढच्या डेस्कवर पत्रिकेचा तो अंक उघडून ठेवत असे. खालसा शाळेत कोणी हिंदीचा अध्यापक नव्हता. त्यांनी एका नव्या अध्यापकाला नियुक्त केले होते. तो आर्य समाजी होता. त्याला खडी बोलीचे पर्याप्त ज्ञान होते. परंतु त्यांनी सूरदास आणि तुसलींच्या रचना कधीही वाचल्या नव्हत्या. म्हणून ते अवधी आणि व्रज भाषेविषयी पूर्णपणे अनभिज्ञ होते. त्यांना माझ्या वर्गात हिंदी शिकविण्यासाठी नियुक्त केले होते. "माधुरी पद्य पारिजात" नावाच्या आमच्या पाठ्यपुस्तकात अवधी आणि व्रज भाषेत अनेक कविता होत्या. त्या वेळी म्यंमामध्ये माझ्याजवळ हिंदीचा एक शब्दकोष होता म्हणून केव्हा-केव्हा कठीण शब्दांचा अर्थ पाहण्यासाठी ते माझ्या शब्दकोषाची मदत घेत असत.

त्या दिवशी माझ्या डेस्कवर हिंदी पत्रिका पाहून गुरुजींनी मला विचारले की, अभ्यासाचे वेळी पत्रिका का घेऊन बसलास? तेव्हा मी त्यांना त्या

पत्रिकेत छापलेला माझा लेख दाखविला. तो वाचून त्यांचा विश्वासच बसला नाही की अशा शुद्ध हिंदीत हा मी लिहिलेला लेख आहे. त्यांनी मला एका विषयावर तेथेच बसून दोन पानांचा लेख लिहिण्यास सांगितले. मी लिहिलेल्या लेखाने ते खूप प्रभावित झाले. मी त्यांचा आवडता शिष्य होतोच आता आणखी जास्त आवडता झालो. वर्गात एकटा मीच हिंदीचा विद्यार्थी होतो आणि गुरुजी प्यारेलालच एकटे हिंदीचे अध्यापक होते.

## कृष्णावर असीम श्रद्धा

मांडले (म्यंमा) मध्ये आमच्या परिवाराचे ठोक कपड्यांचे दुकान होते. त्या दुकानात प्रामुख्याने जपान आणि इंग्लंडमध्ये उत्पादित केलेले कपडेच विकत होतो. परंतु भारतात महात्मा गांधींद्वारा स्वदेशी आंदोलन सुरु झाल्यानंतर मुंबई आणि अहमदाबादच्या मिलमध्ये उत्पादित केलेले कपडे म्यंमामध्ये आयात होऊ लागले. ते सुद्धा आमच्या दुकानात विकू लागलो. त्या कपड्यांच्या ठाणांवर नेहमी कोणते ना कोणते चित्र चिकटविलेले असायचे. त्यामध्ये प्रामुख्याने देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील नेत्यांचे किंवा आमच्या पूज्य देव-देवतांचे चित्र असायचे. एकदा एका कापडाच्या ठाणावर मी माझे आराध्यदेव भगवान श्रीकृष्णाचे फारच सुंदर चित्र चिकटविलेले पाहिले. मी त्या चित्राला खूप प्रेमाने आणि श्रद्धेने काढले. तेव्हाच्या किशोरवयीन बुद्धीप्रमाणे त्याच्या आकाराचा एक कार्डबोर्ड कापून त्यावर चिकटविले. चित्र खराब होऊ नये म्हणून त्याला पारदर्शी प्लॅस्टिकचे कव्हर लावले. त्या चित्राचा आकार एवढा लहान होता की ते माझ्या सदऱ्याच्या पुढच्या खिशात सहज ठेवता येत होते.

मला खूप आठवतय की या चित्राविषयी माझ्या मनात एवढी गाढ श्रद्धा आणि आसक्तीचा भाव सामावलेला होता की त्या किशोरवयापासून जवळ-जवळ २० वर्षापर्यंत मी जो सदरा परिधान करीत असे त्याच्या खिशात ते घालून हृदयाला लावून ठेवत असे. मग भलेही मी म्यंमामध्ये राहो, भारतात राहो किंवा अन्य दुसऱ्या देशात जावो. मनात हीच प्रबळ मान्यता होती की माझ्या जीवनातील सर्व सफलता या परमेश्वराच्या कृपेनेच प्राप्त होत आहेत.

पुढे गेल्यावर हायस्कूलच्या परीक्षेत मी म्यंमामध्ये त्या वर्षातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये सर्व प्रथम आलो होतो. मला सरकारकडून शिष्यवृत्ती मिळाली. माझी मान्यता हीच होती की हे सर्व त्या दयाळू परमेश्वराच्या कृपेनेच झाले.

मी १८ वर्षे वयाचा होतो, तेव्हा जपानी युद्धास सुरुवात झाल्यानंतर मी सर्व परिवाराचा प्रमुख होऊन धोखादायक पहाडी रस्त्यातून पायी चालत म्यंमातून भारतात पोहोचलो. पुढचा प्रवास रेल्वेने करुन परिवारासह पूर्वजांचे गावी चुरुला पोहोचलो. तेथे पोहोचताच परिवारातील सर्व सदस्य खूप आजारी पडले. फक्त मी आणि माझी वहिनी (भाऊ बाबूलालची धर्मपत्नी) निरोगी होतो. इतर सर्वांची स्थिती खूप खराब झाली होती. आम्ही दोघे आजाऱ्यांची सेवा-शुश्रुषा करु लागलो. त्या वेळी माझ्या निरोगी राहण्याला मी त्या महान परमेश्वराच्या कृपेचे फळ मानत होतो. पुढे दक्षिण भारतातही व्यापार करीत असतांना आशातीत सफलता मिळाली. तिलासुद्धा मी माझ्या ईश्वराचीच देणगी मानत होतो.

जपानी युद्ध संपल्यानंतर जेव्हा परत म्यंमामध्ये गेलो तेव्हा व्यापारिक, सामाजिक, सरकारी आणि इतर क्षेत्रात जे असामान्य यश मिळाले त्यांलाही मी माझ्या कृपाळू इष्ट देवाची देणगी मानत होतो. सामाजिक क्षेत्रात न जाणो, किती संस्थांचा मी अध्यक्ष होतो. विशेषतः काही मित्रांबरोबर अखिल ब्रह्मदेशीय काँग्रेसची स्थापना केली आणि संपूर्ण म्यंमामध्ये त्याच्या जवळ–जवळ पन्नास शाखा उघडल्या. अशाच प्रकारे अखिल ब्रह्मदेशीय हिंदी साहित्य संमेलनाची स्थापना केली आणि त्याच्याही जवळ–जवळ दहा शाखा उघडल्या. म्यंमामध्ये हिंदी प्रचाराच्या कामात पूर्णपणे गुंतून राहिलो. साप्ताहिक साहित्य गोष्टींचे संचालन करीत राहिलो. त्याचबरोबर राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना करुन हिंदीच्या उच्च शिक्षणाचे वाचन–अध्ययनाचे कामही करीत होतो व करवून घेत होतो. महात्मा गांधी स्मारक ट्रस्टची स्थापना केली. गांधीजींच्या आत्मकथांबरोबर त्यांच्या काही अन्य पुस्तकांचा बर्मी भाषेत अनुवाद करवून घेतला. ब्रह्मभारती कला केंद्राची स्थापना केली आणि रंगमंचाचेसुद्धा सफल संचालन केले.

क्रमशः......

## विपश्यनेच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त ग्लोबल पगोडामध्ये एक दिवसीय शिबिरासाठी नामांकन आवश्यक

एक दिवसाचे शिबिर दररोज सकाळी ११ वाजेपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत होईल. ज्यांनी सयाजी ऊ. बा. खिन यांच्या परंपरेत पूज्य गुरुजी किंवा त्यांच्या सहायक आचार्यांद्वारे शिकविले जाणारे कमीत कमी एक दहा दिवसाचे विपश्यना शिबिर पूर्ण केले आहे, ते सर्व यात भाग घेऊ शकतात. आवश्यक आणि उचित व्यवस्था करण्यासाठी भाग घेणाऱ्यांची संख्या जाणणे आवश्यक आहे. म्हणून कृपया नाव नोंदणी अवश्य करावी. नाव नोंदणी करणे खूप सोपे आहे. केवळ ८२९१८९४६४४ वर Whats App संदेश Date लिहून पाठवा किंवा SMS द्वारे ८२९१८९४६४५ वर Date लिहून पाठवा.

सर्वांचे मंगल होवो...

## पॅगोड्यावर रात्रभर प्रकाशाचे महत्व

पूज्य गुरुजी वेळोवेळी म्हणत असत की एखाद्या धातु-**गर्भ** पॅगोड्यावर रात्रभर प्रकाश असण्याचे विशेष महत्व आहे. यामुळे सारे वातावरण दीर्घकाळ धर्म व मैत्री तरंगांनी भारलेले राहाते. यासाठी ग्लोबल पॅगोड्यावर प्रकाश दानासाठी प्रती रात्री रुपये 5000/- ठरवले गेले आहेत. अधिक माहितीसाठी वरील (GVF) च्या पत्त्यावर संपर्क करा–

## अंशकालीन अनिवासी लघु पाठ्यक्रम विपश्यना ध्यानाचा परिचय (सैद्धांतिक रुपात)

विपश्यना विशोधन विन्यास आणि मुंबई युनिव्हर्सिटीच्या संयुक्त आयोजनाने नवा लघु पाठ्यक्रम "विपश्यना ध्यानाचा परिचय" सुरु होणार आहे, जो विपश्यना ध्यानाचा सैद्धांतिक पक्ष आणि विभिन्न क्षेत्रात विपश्यनेची व्यावहारिक उपयोगिताला प्रकाशित करेल.

पाठ्यक्रमाची मुदत- २ ऑगस्ट ते १ नोव्हेंबर २०१८ (३ महिने)

ठिकाण- सभागृह नंबर २, ग्लोबल पगोडा परिसर गोराई, बोरीवली (प) मुंबई ४०००९१. अधिक माहिती आणि आवेदनपत्र ह्या वेब लिंक वर प्राप्त करा.

https://www.vridhamma.org/Pali-Study-Programs; संपर्कः 022-62427560 (सुबह 09:30 से शाम 05:30); ई-मेल: mumbai@vridhamma.org

## अफ्रिकेतील पूर्वेकडील देश जसे इथियोपिया तसेच इरिट्रियामध्ये विपश्यना शिबिर

इथियोपिया विपश्यना न्यासा (पूर्व अफ्रिका) ने २३ पेक्षा अधिक १० दिवसीय शिबिर, काही ३ दिवसीय शिबिर, सतिपट्ठाण तसेच लहान मुलांची शिबिर आयोजित केली. सध्या तीन इथियोपियन सहायक आचार्य आणि दोन बाल-शिबिर शिक्षक उपलब्ध आहेत. शिबिरात भाग घेणारे साधक एक तर व्यापारी किंवा नोकरी करणारे किंवा विश्वविद्यालयातील विद्यार्थी आहेत. स्थानिक किंवा आंतर्राष्ट्रीय दान देणाऱ्या साधकांच्या मदतीमुळे काही साधकांनी भारतात येऊन दीर्घ-शिबिर सुद्धा केली आहेत. अशी आशा आहे की तेथे विपश्यना केंद्राकरीता जागा मिळू शकते. तेथील लोक तसेच बरेचसे जुने साधक असा विचार करु लागले आहेत की शेजारील इरिट्रियामध्ये सुद्धा शिबिर आयोजित करण्याची वेळ आली आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क कराः arsemitti@yahoo.com or denekewk@gmail.com; इरिट्रियातील अथवा त्या भागातील कोणी जुना साधक वरील मेलवर संपर्क करुन भविष्यातील धर्म प्रसाराच्या संभावनांवर विचार करु शकेल. धन्यवाद!

**Photos from children's courses:** http://www.children.dhamma.org/en/children/what-others-say.shtml, Africa.

### अतिरिक्त उत्तरदायित्व

१ श्री पुंडलिक अहिरे, धम्म सरिता, विपश्यना केंद्राच्या केंद्र-आचार्यांच्या रुपाने सहायता

### नवे उत्तरदायित्व
### वरिष्ठ सहायक आचार्य

१. श्री मृत्युंजय शास्त्री, जळगांव
२. श्रीमती हेमलता शास्त्री, जळगांव

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

१. श्री चंद्रकांत गनेडीवाला, नागपूर
२. श्रीमती वंदना गवळी, नागपूर
३. श्री धेंडूप डी लामा, सिक्किम

### बाल-शिबिर शिक्षक

१. श्रीमती भाग्यश्री वाल्वेकर, पुणे
२. श्री रमेश जगताप, मुंबई
३. डॉ. श्रीमती मोहिनी गाडे, मुंबई
४-५. श्री कृत रंजन व श्रीमती प्रांतिका चाकमा, अगरतला, त्रिपुरा
६. श्री स्वर्ण कमल चाकमा, अगरताला, त्रिपुरा
७. श्री तपव्रत चक्रबोर्ती, पश्चिम बर्धन, पश्चिम बंगाल
८. श्री अमल मंडल, कोलकाता, प. बंगाल
9. Mr. Piotr Suffezynski, Poland

## ग्लोबल विपश्यना पॅगोडा परिचालनार्थ सेंचुरीज कॉर्पस फंड

पूज्य गुरुजींची इच्छा होती की, 'ग्लोबल विपश्यना पॅगोडा' पुढील दोन-अडीच हजार वर्ष चांगल्या प्रकारे लोकांची धर्मसेवा करीत राहो. परंतु येथे येणाऱ्यांकडून कोणतेही शुल्क न घेतले जावो, जेणेकरुन गरीब-श्रीमंत सर्वच येथे सहजरित्या येवोत आणि सद्धर्माविषयी जाणून धर्मलाभी होवोत आणि यासाठीच येथील दैनंदीन खर्च सांभाळण्यासाठी एका 'सेंचुरीज कॉर्पस फंडा'ची व्यवस्था केली जावी. त्यांची ही महत्वाची इच्छा पूर्ण करण्यासाठी 'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन' (GVF) ने हिशोब केला की जर ८७६० जणांनी, प्रत्येकाने रु. १.४२.६९४/- एका वर्षात जमा केले, तर १२५ कोटी रुपये जमतील आणि त्याच्या मासिक व्याजातून हा खर्च होऊ लागेल.

संताची वाणी आहे की जो पर्यंत भगवान बुद्धांचे धातु राहातील, त्यांचा धर्म सुद्धा कायम राहील. या अर्थी केवळ दगडांपासून बनलेला हा धातुगब्भ पॅगोडा हजारो वर्षापर्यंत बुद्ध-धातुंना सुरक्षित ठेवेल आणि यात ध्यानाभ्यास करणाऱ्या असंख्य प्राण्यांना धर्मलाभ मिळेल. म्हणजेच, याच्या परिचालनासाठी मोठ्या वित्तीय आवश्यकतांना पूर्ण करण्यासाठी साधक तसेच असाधक सर्व दात्यांना हजारो वर्षांपर्यंत आपली धर्मदानाची पारमी वाढविण्याची ही एक सुसंधी आहे. अधिक माहितीसाठी तसेच निधी पाठविण्यासाठी **संपर्क**: 1. Mr. Derik Pegado, 9921227057. or 2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156, A/c. Office: 022-62427512 / 62427510; **Email–** audits@globalpagoda.org; **Bank Details:** 'Global Vipassana Foundation' (GVF), Axis Bank Ltd., Sonimur Apartments, Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064, Branch - Malad (W). Bank A/c No.- 911010032397802; IFSC No.– UTIB0000062; Swift code: AXISINBB062.

## धम्मालय - 2 निवास-गृहाचे निर्माण कार्य

पॅगोडा परिसरात **'एक दिवसीय'** महाशिबिरात दुरुन येणाऱ्या साधकांसाठी व धर्मसेवकांसाठी रात्री निवासाच्या मोफत सुविधेसाठी **धम्मालय-2** निवास-गृहाचे निर्माण होईल. जे कोणी साधक-साधिका या पुण्यकार्यात भागीदार होऊ इच्छितात, त्यांनी कृपया वरील (GVF) च्या पत्त्यावर संपर्क साधावा.

### ग्लोबल पॅगोड्यात सन २०१८-१९ मध्ये एक दिवसाचे महाशिबिर आणि महासंघदानाचे आयोजन

**रविवार दि. ३० सप्टेंबरला– शरद पौर्णिमा** आणि **पूज्य गुरुजींची पुण्यतिथी–** (२९ सप्टेंबर) तसेच रविवार दि. **१३** जानेवारी २०१९ रोजी पूज्य माताजींची पुण्यतिथी (५ जानेवारी) आणि सयाजी ऊ. बा. खिन यांच्या पुण्यतिथी (१९ जानेवारी) निमित्त पगोडा परिसरात सकाळी ९.३० वाजता बृहत संघदानचे आयोजन केले जात आहे. त्यानंतर ११ वाजेपासून साधक-साधिका एक दिवसाच्या महाशिबिराचा लाभ घेऊ शकतील. जे साधक-साधिका ह्या पुण्यवर्धन दान कार्यात भाग घेऊ इच्छितात त्यांनी कृपया खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क करावा - 1. Mr. Derik Pegado, 9921227057 or 2. sri. Bipin Mehta, Mo. 9920052156, फोन: 022- 62427512 (9.30 AM to 5.30 PM), Email: audits@globalpagoda.org

**एक दिवसीय** महाशिबिर. **वेळ:** सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत होईल. ३-४ वाजताच्या प्रवचनात साधना न केलेले लोकसुद्धा बसू शकतात. नाव नोंदणीसाठी कृपया निम्न फोन क्रमांक किंवा ईमेल द्वारा ताबडतोब संपर्क करा. कृपया नाव नोंदणी न करता येऊ नये. **समग्गानं तपो सुखो**- सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. **संपर्क:** 022-28451170, 022-62427544, Extn. no. 9, 82918 94644 (फोन बुकिंग 11 ते 5 वाजेपर्यंत) **Online Regn.**: www.oneday.globalpagoda.org

### दोहे धर्माचे

अहो भाग्य! सद्गुरु मिळे, कैसा संत सुजाण।
मार्ग दाखवि मुक्तीचा, शुद्ध जागवी ज्ञान॥
सद्गुरु ची संगत असे, जागे पुण्य अनंत।
सत्य धर्माचा पथ मिळे, करी पाप रे अंत॥
सद्गुरु ची करुणा जगे, दिले धर्माचे सार।
संप्रदाय चे ओझे, उतरला च रे भार॥
धन्य!धन्य! गुरुवर मिळे, ऐसा संत सुजाण।
सुटली मिथ्या कल्पना, सुटे रे मिथ्या ज्ञान॥

### दोहे धर्माचे

विना सतगुरु मिळत नसे, पावन धर्म प्रकाश।
मोह-निशा तुटतच नसे, तुटत नसे भवपाश॥
सतगुरुंनी च ना दिला, सत्य धर्म प्रकाश।
तर अंतरी राहतसे, अंधकाराचा वास॥
सतगुरु ची संगत असे, मिळे सत्याचे सार।
जीवन सफल रे झाले, हृदयी उतरे भार॥
सतगुरु ची करुणा जगे, दिले धर्माचे सार।
संप्रदाय चे ओझे, उतरला च रे भार॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, जी-259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2562, श्रावण पौर्णिमा, 26 ऑगस्ट 2018

वार्षिक शुल्क रु. 30/-, US $ 10, आजीवन शुल्क रु. 500/-, US $ 100. **MAHMAR/2017/72685**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**DATE OF PRINTING AND PUBLICATION: 26 Aug, 2018**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086, 244144, 244440. फैक्स : (02553) 244176**
Email: vri_admin@dhamma.net.in;
course booking: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org